तीन महिन्याच्या कालावधी पर्यन्त जातीच्या प्रमाणपत्राची तपासणी करुन निर्णय द्यावयाचा आहे. तपासणी समितीचा निर्णय तीन महिन्याच्या कालावधीत प्राप्त झाला नाही तर, आपल्या विभागाने त्या अनुसूचित जमातीच्या उमेदवारास तात्पुरती नेमणूक द्यावयाची आहे. ही तात्पुरती नेमणूक तपासणी समितीच्या निर्णयाधीन असेल व तसा स्पष्ट उल्लेख नेमणुकीच्या आदेशात [अपॉईंटमेंट ऑर्डर] करण्यात यावा. ह्या शासन निर्णयाचा व शासन निर्णयामधील मुद्दा क्र. ३ याबाबत अधिकचा खुलासा व्हावा यासाठी खालील प्रमाणे उदाहरणासह स्पष्ट करण्यात येत आहे.

[१] समजा आपल्या कार्यालयाने उमेदवाराचा अर्ज व माहितीसह इतर कागदपत्रे १ जानेवारी १९९४ रोजी कमिटीस पाठविली असतील तर तपासणी समिती उमेदवारास लिहून आणखी काही जादा कागदपत्राची मागणी करु शकते. ही मागणी करण्याची मुदत सुध्दा ३ महिन्याची राहील.

[२] समजा उपरोक्त प्रकरणात कमिटीने २५ मार्च १९९४ रोजी उमेदवारास माहिती मागीतली तर त्या उमेदवाराने २५ जून १९९४ पर्यन्त माहिती दिली पाहिजे. ती माहिती जर या अवधित दिली नाही तर प्रमाणपत्र अवैध ठरेल.

[३] समजा त्याने [उमेदवाराने] २० जून १९९४ पर्यन्त माहिती तपासणी समितीस दिली तर त्या प्रकरणात समिती १९ सप्टेंबर १९९४ पर्यन्त निर्णय देऊ शकते. जर समितीने १९ सप्टेंबर पर्यन्तही निर्णय दिला नाही तर त्या उमेदवारास महामंडळ तात्पुरती नेमणूक देऊ शकते. ही तात्पुरती नेमणूक समितीच्या निर्णयाधीन राहील.

[४] जर समितीने ३ महिने होऊन सुध्दा कागदपत्र मागितले नाहीत किंवा प्रमाणपत्र अवैधही ठरविले नाही तर त्या उमेदवारास महामंडळ तात्पुरती नेमणूक देऊ शकते व ही नेमणूक समितीच्या निर्णयाधीन राहील.

वरील उदाहरणावरुन शासन निर्णयाचा अर्थ काय आहे हे स्पष्ट झाले असेलच त्याप्रमाणे कार्यवाही करावी व शासन निर्णय क्र. सीबीसी-१६८५/५१३/का-१०, दि. १८ एप्रिल १९८९ मधील सूचनांची अंमलबजावणी होत आहे याची दक्षता घ्यावी.

शासनाने शासन निर्णय क्र. सीबीसी-१६८५/[५१३]/का-१०/दि. १३ ऑगस्ट १९८५ मधील परिपत्रक क्र. २ मध्ये शासन निर्णय क्र. सीबीसी-१६८५/५१३/का-१० दि. १८.४.८९ अन्वये अंशतः बदल केला असल्यामुळे या कार्यालयाचे कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. ५१/९० रद्द करण्यात येत आहे याचीही नोंद घ्यावी.

उप महा व्यवस्थापक [क. व औ. सं.]

प्रत सादर रवाना :-

मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी [सेवामंडळ] / सहायक कर्मचारीवर्ग अधिकारी [मुख्यालय] / पर्यवेक्षक [वर्ग-३ राज्य संवर्ग] ..... माहितीसाठी व आवश्यक तेथे अंमलबजावणी करण्यासाठी.

25/x/95

उप महा व्यवस्थापक [क. व औ. सं.]